सांगोपन...

सांग आई, काय काय मी करू माझ्या जीवनी?
उत्तरली...इतकेच करी, सुखी राहा तू मनी...

सुसंस्कृत तू, भल्या बु-याची असे तुला जाणीव
तरी जगी ह्या करू नको रे कधी कुणाची कींव

शिकलेला तू, ज्ञात तुला, सर्वाला उत्तर नसते
अशिक्षिताही त्याची प्रचिती जगण्यामधुनी मिळते

रसिक तू, कवने रचसी, शब्द प्रसविता ओठी
अनपड भाविक अभंग गाता तालावर नाचती

तुझ्या शिदोरी, बांधियली मी, प्रेमाने भाकरी
भूक लागता, दे दुस-याही, मागता कुणी चतकोरी

वारकरी तू, मार्गावर तव, चंद्र उजळता गगनी
हवाहवासा जरी वाटला, नच कोणी त्याचा धनी

विजय पाठारे